## रे.मु.नं.१२९०/२०१५ मधील निशाणी क्रमांक १८ वरील आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २६ नियम ९ प्रमाणे कमिशनेकरिता दिलेला आहे. वादीने सदरचा दावा हा जाहीर ठराव व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला त्यात प्रतिवादीने हजर होवून दाव्यास कैफियत तसेच प्रतिदावा दाखल केला असुन त्यात जाहीर ठराव तसेच मनाई हुकूम मागितलेला आहे. प्रतिवादीचे म्हणणे की, वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे भाऊबंद असुन १९८० पुर्वी गट नं.१७४ हा प्रतिवादीचे चुलते मयत नामदेव व गट नं.१७३ व गट नं.१७५ हे वादी नं.१ चे भाऊ व प्रतिवादी नं.२ व ४ चे वडिल पांडूरंग यांचे नावावर होता. गट नं.१७३ व गट नं. १७५ च्यामध्ये गट नं.१७४ असल्याने सन १९८० पुर्वी मयत नामदेव व मयत पांडूरंग यांनी सामंजस्याने शेती करण्यास सोयीस्कर व्हावे म्हणून आपसात तडजोड करून गट नं.१७५ व गट नं. १७४ हा मयत पांडुरंग यांचे ताब्यात तर गट नं.१७३ मध्ये उत्तर बाजुकडील ०.५१ आर क्षेत्र मयत नामदेव यांचे नावावर असलेले गट नं.१७४ एवढे क्षेत्र आपसात मोजणी करून मयत नामदेव यांचे ताब्यात दिले. रे.मु.नं.७२/१९८० नुसार गट नं.१७४ हा प्रतिवादीचे नावावर आला परंतु प्रत्यक्षात मयत नामदेव नंतर गट नं.१७३ मधील उत्तर बाजुकडील ०.५१ आर क्षेत्र प्रतिवादीचे ताब्यात व वहिवाटीस आले. गट नं.१७३ मधील उत्तरेकडील ०.५१ आर क्षेत्रावर वादीचा केव्हाही ताबा नव्हता व नाही. या क्षेत्रावर प्रतिवादीने मेहनत मशागर करून जमिनी बागायती केल्या, पाईपलाईन केली तसेच नविन घर बांधण्यासाठी, विटा व वाळू इ. आणून टाकले. यास्तव खरी वस्तुस्थिती समोर येण्याकरिता कोर्ट कमिशनरची नियुक्ती होवून मिळण्याची विनंती केली आहे.

२. वादीने यांनी प्रस्तुत अर्जास नि.२० वर म्हणणे दाखल केले. वादीचे म्हणणे की, सदरचा अर्ज हा खोटया वस्तुस्थितीवर आधारीत आहे. तसेच प्रतिदाव्याच्या मिळकतीमधील जे क्षेत्र प्रतिवादीने नमुद केले आहे ते वादी यांचे ताब्यात आहे. सातबारा उता-याप्रमाणे मालक व कब्जेदार सदरी वादी यांचे नावाची नोंद आहे. यामुळे कोर्ट कमिशनरव्दारे प्रतिवादीस पुरावा गोळा करता येणार नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. वादीचे विधिज्ञ श्री.एस.एम. दिक्षित व प्रतिवादीचे विधिज्ञ श्री.एस.जी.होळकर यांचा युक्तिवाद ऐकला. दावा व प्रतिदाव्याचे अवलोकन केले. सदरचा दावा हा वादीने दाव्यामध्ये नमुद गट

नं.१७३, १७५, १८० व १३४ चे मालकी वहिवाटीस असल्याचा जाहीर ठराव मिळण्याकरिता व मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केला आहे. तर प्रतिदावा हा प्रतिवादींनी गट नं.१७३ पैकी उत्तरेकडील ०.५१ आर क्षेत्र हे त्यांचे मालकीचे असल्याचे व गट नं.१७४ हा वादीच्या मालकीचा असल्याचा जाहीर ठराव होवून मिळण्याकरिता व मनाई हुकूम मिळण्याकरिता केलेला आहे. प्रतिवादीचे म्हणणे प्रमाणे गट नं.१७३ हा वादीचे नावे आहे व गट नं.१७४ हा अभिलेखाला प्रतिवादीच्या नावावर आहे. परंतु गट नं.१७४ हा गट नं.१७३ व गट नं.१७५ च्या मध्यभागी असल्याने वादी व प्रतिवादीचे पुर्वजांनी उत्तरेकडील गट नं.१७३ चे ०.५१ आर क्षेत्र हे प्रतिवादीच्या पुर्वजांच्या ताब्यात दिले व गट नं.१७४ चे ०.५१ आर क्षेत्र हे वादीच्या पुर्वजांचे ताब्यात दिले. या सर्व बाबींचे अवलोकन केले असता अभिलेखाप्रमाणे गट नं.१७४ हा प्रतिवादीच्या नावे व गट नं.१७३ व १७५ हा वादीच्या नावे आहे जर प्रतिवादीच्या विनंतीप्रमाणे कोर्ट कमिशनरची नियुक्ती केल्यास वादीने जी केस केली आहे त्या केसचे प्रतिवादी हे खंडण करीत असल्यामुळे जर हा अर्ज मान्य केला तर प्रतिवादीच्या वतीने कोर्ट कमिशनरव्दारे पुरावा गोळा करणे असे होईल. प्रतिवादी हे त्यांचेतील आपसातील समजुतीनुसार झालेल्या वस्तुस्थितीबाबत केस घेवून येतात. त्यामुळे प्रतिवादीवर त्यांची त्यांची केस सिदध करण्याची जबाबदारी आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. यास्तव खालील आदेश पारित करण्यात येतो. .

## <u>आदेश</u>

सदरील अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

सही/-

(के. पी. जैन देसरडा)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
संगमनेर.

दिनांक :-०७/१०/२०१७